# प्रकरण ३ रे
# आशा बगे व्यक्ती व वाङ्मय

# प्रकरण तिसरे
# आशा बगे व्यक्ती व वाङ:मय

आशा बगे याचे कथा कादंबरी विश्व चांगल्या अर्थाने भारतीय परंपरेचे निकोप रूप ताजे असलेले दिसून येते. त्यांना भारतीय संगीताबद्दल विलक्षण ओढ आहे. जीवनातील व्रतवैकल्य, सण, उत्सव इ. गोष्टीचे भरपूर ज्ञान त्यांना वारसा परंपरेने लाभलेले दिसून येते. आशा बगे विदर्भामधल्या असून नागपूर हे त्याचे जन्मठिकाण आहे. मराठी विषय घेवून एम.ए. नागपूर विद्यापीठामध्ये केले. संगीतातील एम म्युझिक पदवी खैरागड विद्यापीठातून मिळवली आहे. त्यांच्या अनेक कथा, कादंबऱ्यामधून संगीत, नाटकातील पदे यांचा अंतर्भाव दिसून येतो. आकाशवाणी रंगभूमीवर त्यांनी काही नाटकांचे संगीत दिग्दर्शन केले आहे. संगीताचा वारसा त्यांना आईवडिलाकडून मिळाला त्यांचे साहित्य वाचत असताना या लेखिकेला अभिजात शास्त्रीय संगीताची जाण असून त्या गात असाव्यात असे वाटते. त्यांनी आपल्या कादंबरीतून नव्या स्त्रीच्या व्यक्तिमत्व घडणीचा शोध घेताना दिसतात. कादंबरीतील व्यक्तिरेखा साकार करताना त्यांची वेदना शुध्द सोन्यासारखी वाटते. नात्यानात्यातील सुक्ष्म पदर हाताळताना त्यांची कलात्मकता प्रभावीपणे दिसून येते. आशाबगे स्वत:बद्दल म्हणतात, "फुलापलिकडच्या नागपूरने लेखक म्हणून माझा पिंड घडवला या परिसरानेच माझ्या गाण्याच्या, नाटकाच्या, आवडीच्या मूळाशी खतपाणी घातले."[१] आपल्या साहित्यकृतीतून त्यांनी माणसामाणसातील संबंधाचा शोध घेतला. व त्यातून त्यांनी त्या व्यक्तिरेखा बोलक्या करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे बालपण एकत्र कुटूंबात गेल्याने आजोबा, आई, वडिलांचे सुसंस्कार झाले त्याचा प्रभाव त्यांच्या साहित्यातून दिसून येतो.

## आशा बगे यांच्या लेखणाच्या प्रेरणा :-

आशा बगेची निकोप जीवनदृष्टी, व्यापक आशय घनता, माणसाच्या मनाचा वेध घेण्याचे सामर्थ्य, कलात्मक कौशल्याचे निसर्गत: लेणे जीवनातील गुढपणाच्या खूल्या मनाने स्विकार करण्याची वृत्ती दिसून येते. पुरूष लेखकाइतकेच स्त्रीलेखिकांनीही याकाळात लेखन केलेले

दिसून येते. विजया राज्याध्यक्ष यांनी स्त्रियांच्या समस्याकडे दु:खाकडे सहानुभूतीने न पाहता जीवंत माणूस म्हणून पाहिले स्त्रीला भोगाव्या लागणाऱ्या सर्व ताणांचे अत्यंत समर्पक व कलापूर्ण भान व्यक्त केले. एक बुद्धिवान स्त्री म्हणून त्यानी स्त्रीला समजावून घेतले स्त्री शिक्षणाच्या प्रसारामुळे जागरूक होणाऱ्या स्त्रीची दृष्टी, सांस्कृतिक जीवन, त्यातील समस्या, गिरीजाबाई केळकर, काशीताई कानिटकर, कमलाबाई टिळक यांचे लेखन यादृष्टीने महत्वाचे आहे. सांस्कृतिक दडपणामुळे स्त्रियांची मानसिक घुसमट वाढली. स्त्री- जीवनाशी निगडित भावनिक पैलूंवर लेखिका लेखन करू लागली. १९७० नंतरच्या कालखंडामध्ये चिकित्सक दृष्टीने लेखनात धीटपणा आला. त्यातून गौरी देशपांडे, सानिया, मेघना पेठे, छाया दातारा, निरझा, यांनी स्त्रीच्या दुय्यम सामाजिक स्थितीबद्दल लेखन केले. स्त्री- लेखिकांच्या कादंबऱ्यातून मध्यमवर्गीय स्त्रियांच्या व्यथा, वेदना, एकाकीपणा दूबलता चित्रीत झालेला दिसून येतात. गौरी देशपांडे, कमल देसाई, आशा बगे, अंबिका सरकार, रोहिणी कुलकर्णी, शांता गोखले आदि स्त्री- लेखिकांनी लेखणीच्या माध्यमातून स्त्रियांचे विश्व, अविवाहित स्त्रियांचे प्रश्न, नोकरी करणाऱ्या एकत्र कुटूंबपद्धतीत दबलेल्या, पुरूषाच्या विकृतीला बळी पडलेल्या स्त्रियांच्या व्यथा टिपण्याचा केलेला प्रामाणिक प्रयत्न दिसून येतो. सामाजिक दडपणामुळे मालतीबाई बेडेकरांना टोपणनावाचा आश्रय घ्यावा लागला होता. १९३९-४० च्या दरम्यान विवाहविषयक कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या त्यात काही स्त्री- लेखिका दिसून येतात. स्त्री - जीवनात येणाऱ्या समस्या विवाहामुळे जीवनात होणारे बदल उच्च शिक्षणाच्या प्रसार, गोष्टीवेल्हाळपणाची देणगी, आत्मचिंतनाचा हुंकार या सर्वांचे प्रतिबिंब स्त्री लेखिकांना कादंबरीत मांडल्याचे दिसून येते. संस्कृतमधील आदर्श, इंग्रजीचे अनुकरण, याचा प्रभाव पडलेला दिसतो. 'साळूबाई तांबवेकर 'यांनी "चंद्रप्रभाविरहवर्णन" (१८७३) ही कादंबरी प्रसिद्ध केली. यामध्ये अद्भुतता दिसून येते. साक्या, आर्या इ. चा वापर केलेला दिसून येतो. विभावरी शिरूरकर 'कळ्याचे निश्वास' या पहिल्या कथासंग्रहाने छाप पाडली प्रौढ कुमारिकांच्या जीवनातील समस्याचा धीटपणे वेध घेण्याच्या प्रयत्न दिसून येतो. 'हिंदोळ्यावर' (१९३४) यामध्ये स्त्रीला एकटेपण दाटून आलेले दिसते. लेखिकेने लिहिलेली

स्वयंकेंद्री व्यक्तीची जीवनकथा आहे. 'विरलेले स्वप्न' (१९३५) ही आत्मकेंद्रित जीवनकथा आहे." तुझ्याजवळ तुझी म्हणून येण्याचे धैर्य नाही मला होत.", असे म्हणणाऱ्या रोहिणीच चित्र रेखाटतात.'बळी'(१९५०) उदारवात्सल्य भावनेने आबाच्या जीवनाचे चित्रण, पात्राकडे पाहण्याचा वेगळा दृष्टीकोन, भाषाशैलीत बदल, कथेचा शेवट परिणामकारक त्यामुळे बळीमध्ये नव्या जाणिवांचा उत्कृष्ठ अविष्कार झालेला दिसतो. गीता साने स्त्री स्वातंत्र्याशी निगडीत असलेल्या प्रश्नांचा विचार करताना त्यांची लेखणी दिसते. 'निखळलेली हिरकणी'(१९३६) या त्यांच्या कादंबरीतून स्त्रीविषयी आपुलकी, जिव्हाळा, तिला स्वत:विषयीच्या आत्मविश्वासाचा प्रत्यय येतो. 'हिरवळीखाली' (१९३६) 'वटलेला वृक्ष' (१९३६) 'लतिका'(१९३७)'माळरानात' (१९४०)'अविष्कार' (१९४६) 'दीपस्तंभ' (१९५०) या त्यांच्या कादंबऱ्यातून राजकारणाने, व्यक्तीजीवन, कौटुंबिक संबंध कसे बिघडतात यासारख्या प्रश्नाकडे त्या पाहतात.

प्रेमा कंटक मराठी लेखिकापैकी गांधीवादाचा पुरस्कार करणाऱ्या व गांधीजींच्या आदर्शाप्रमाणे जीवन जगणाऱ्या दिसून येतात. त्याची 'काम आणि कामिनी' (१९३७) ही कुतूहलजनक कादंबरी आहे. 'अग्नीया'(१९४२) इत्यादी कलाकृतीतून लेखकौशल्य व जीवनविषयक जाणीव दिसते. त्यातील व्यक्तिरेखा उठावदार आहेत. मानवी भावभावनांच्या समस्यां केद्रस्थानी ठेवलेल्या दिसतात.

मालतीबाई दांडेकर स्त्री आणि तिचे जीवन व समस्या स्त्रीमनाच्या दृष्टीने मोजकेच क्षेत्र आपल्या कादंबरीसाठी आखून ठेवलेले दिसते. घटस्फोट झाला तरी स्त्रिला मुक्त होता येत नाही. याचे चित्रण 'काटेरी मार्ग'(१९४१), 'तेजस्विंनी' (१९४३) या लेखणातून स्त्रिच्या जीवनातील समस्या मांडून विचार करायला लेखन त्यांच्या लेखणीतून व्यक्त होते.

गौरी देशपांडे यांनी 'कारावासातून पत्रे', 'एकेक पान गळावया', 'दुस्तर' 'हा घाट आणि थांग', 'ते तेरूओ' आणि 'काही दुरपर्यंत' 'मुक्काम' इ. कादंबऱ्या लिहिल्या यातून भारतीय स्त्रिच्या मानसिकतेचा शोध त्यांच्या कादंबरीतून दिसून येतो.

कुमारिकांच्या विचार–विकारांचे दर्शन 'कळ्यांचे निश्वास' (१९३३)प्रक्षोभक असून याविषयी बाळूताई खरेनी 'प्रौढ– कुमारिका' हा समाजाचा जिज्ञासेचा विषय असला तरी एकाद्या स्त्रीने या प्रश्नाचा वेध घेणे हे धाडसाचे काम दिसते. त्यानंतर 'हिंदोळ्यावर' कादंबरी प्रश्नार्थक आहे. 'विरलेलं स्वप्न' १९३५ यामधून मनदौर्बल्य आणि भोगलालसा यांची द्योतक आहेत. या कादंबरीमधून कोंडमारा सहन करणाऱ्या मुळी आढळतात लक्षणीय कामगिरी करणाऱ्या गीता साने यांनी स्त्रीसमोरच्या सामाजिक समस्यांचे चित्रण केले आहे. सामाजिक समस्या मांडू न स्त्रिला माणूस म्हणून कुटूंबात व समाजात स्थान कोणतेही तात्विक भूमिका होऊन सामाजिक समस्येचे वस्तुनिष्ट विश्लेषण करतात.

या कालखंडातील स्त्रियांनी कथानकाच्या रचनेकडे वा व्यक्तिचित्रणाकडे लक्ष न देता समस्यावर भर दिलेला दिसतो. सर्वांच्या चिंतेचा विषय विवाहसंस्था या विवाहामुळे स्त्री सर्व बाजूंनी परतंत्र होते व तिच्या व्यक्तिविकासाला वाव मिळत नाही.

आशा कितीतरी प्रश्नावर चर्चा झाली. सौ.शान्ताबाई नाशिककर यांनी 'लग्नाचा बाजार' यामध्ये स्त्रीला स्वास्थ हवे असेल तर विवाहसंस्थेमध्ये परिवर्तन घडवून आणले पाहिजे हा विचार दिसेतो कुमूदिनी प्रभावळकराची 'एकेरी गाठ' ही कादंबरी घटस्फोटाची आवश्यकता प्रतिपादन करते. सौ. इंदिराबाई सहस्त्रबुद्धेनी 'गोदावरी' (१९१७) मध्ये बालविवाहाचा निषेध पुर्नविवाहाची आवश्यकता स्पष्ट करतात. स्त्री पुरूषांचे बौध्दिक सामर्थ्य निराळे असते. 'वीणा' (१९४३) व ' दोन घडीचा डाव'या कादंबरीमधून वैवाहिक जीवनातील अतृप्तीच स्त्री–पुरूषांच्या दु:खाला कारण ठरते. शांताबाई शेळके यांचा पिंड रोमॅन्टिक साहित्यावर पोसलेला असावा. त्यामुळे त्याच्या लेखणात कल्पनारम्यता आहे. मालतीबाई दांडेकर यांनी आलेल्या अनुभवाच्या आधारे कादंबरी लेखन करतात. कुटूंबाचे स्थैर्य व सुख स्त्रीच्या कर्तृत्वावर अवलंबून असलेले दिसते. स्त्रीला दु:ख वेदना तिने दिलेली दु:खाशी झुंज या भुमिकेतून त्यांनी कादंबरीलेखन केलेले दिसते. लीला दीक्षितांची 'मधुबोल' (१९४९) उषामंत्री यांची 'निष्पाप व्याभिचार' (१९४४) नलिनी मुळगावकरांची 'तृष्णा' (१९४२) रत्नप्रभा रणदिवे 'छायानट' (१९४४)

‘पुर्णिमा’(१९४४) मनोरमा निमकर यांची ‘अखेरची लाट ’(१९५०) शालिनी तुळपुळे यांची ‘लपलेले गुन्हेगार’इ.काही कादंबरीतून सामान्यपण अधिक लक्षात येते. काही कादंबरीकारांनी कादंबरी लिहून आपल्याभोवती घडले आहे याचे भान वाचकाला आणून दिले.

विवाहबाह्य संबंध, बलात्कार, अत्याचार, लैंगिक विकृती इत्यादींचे चित्रण स्वातंत्र्यपूर्व काळात विभावरी, गीता साने, इंदिराबाई सहस्त्रबुध्दे ,कृष्णामाई मोटे इत्यादी स्त्रिया वृत्तिगांभीर्याने लेखन करीत. स्त्रीचे मन, स्त्री – जीवनातील समस्या यांच्याविषयी भूमिका दिसते. मीनाक्षीचे जीवन यामध्ये मिनिची आत्मकथा आहे. स्त्री जीवनातील समस्याचे चित्रण करणाऱ्या, स्त्री–मनाचे दु:ख प्रभावी रीतीने मांडनारी विभावरी शिरूरकरांची ‘बळी’ प्रसिद्ध झाली. वाचकांचे लक्ष एका वेगळ्याच अनुभव विश्वाकडे वळताना दिसते. मध्यमवर्गीय विशेषत: ब्राह्मणवर्ग–कुटूबांची सुखदु:खे कादंबरीतून चित्रित होत होती.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात कादंबरीकार म्हणून स्थान मिळविण्याचा प्रयत्न करताना सौ.जोस्ना देवधर यांनी कादंबरी लेखन विपुल केले. सौ.नयना आचार्य, सौ.शैलजा राजे सौ.कुसूम अभ्यंकर यांनी कादंबरी लेखन केले ‘अंधारातील दु:ख’ (१९६५) या कादंबरीमध्ये सौ.लिला श्रीवास्तव यांनी मध्यमवर्गीय स्त्रीचे चित्रण केलेले दिसते. नितिअनितिच्या चरकामध्ये सापडून नष्ट झालेली सुनीता ही एक सामाजिक दुर्घटना आहे. स्त्री जीवनातील समस्येचा वेध घेवून पुन्हा पुन्हा एकाच त्रिकोणामध्ये आयुष्य जगणारी व्यथा दिसते ‘दोघी’ (१९७५) मधील वाचताना लेखिकेची मर्यादा दिसते. मायलेकीमधील जीवनदृष्टीतील वेगळेपण दिसून येते. सौ.शकुंतला गोगटे यांनी २५ पेक्षा अधिक कादंबरी लिहिल्या प्रेमाचा त्रिकोणाचे वळण गिरविण्यापलिकडे त्यांची लेखणी गेली नसल्याचे दिसून येते.

१९७० नंतरच्या कालखंडामध्ये स्त्रियांच्या कादंबरी लेखनाला बहर आलेला दिसतो. कादंबरीच्या केंद्रस्थानी स्त्री असावी असे प्रयत्न दिसून येतात ‘ऐने महाल’ (१९७२) या कादंबरी लिहिली त्यातून स्त्रिची पारंपारिक प्रतिमा रंगवलेली दिसते. ‘आधार’ ‘आश्रित’ इ. कादंबऱ्यातून उच्चवर्णीय धनिक कुटूंबाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्या लिहिणाऱ्या चंद्रप्रभा जोगळेकर

'संजीवनी' या कादंबरीत वेगळा विषय हाताळताना दिसतात. 'योगिनी जोगळेकर' यांच्या कादंबरीमधून बोध पाजण्याचा प्रयत्न अधिक दिसतो. 'वादळफुल' 'गुलबक्षी', 'कचबंध', 'ज्योतिर्मयी', या कादंबरी योगायोगावर आधारलेल्या घटनांवर कादंबरी उभी करतात. बहुसंख्य लेखिकांनी प्रेमकथा रचण्यातच आपली सर्व शक्ती खर्च केली असे दिसते.

डॉ.सुमती क्षेत्रमाडे यांच्या कादंबरी लेखणाचे वळण खांडेकरांच्या कादंबरी लेखनाशी संवादी असलेले दिसते. 'आधार' या त्यांच्या कादंबरीत नर्सिंगचा व्यवसाय करणाऱ्या स्त्रीचे चित्र आहे. 'महाश्वेता' या कादंबरीत कोड आलेल्या स्त्रीच्या व्यथा रंगवितात त्या म्हणतात "पुष्कळशा शारिरीक दुखण्याची कीड मानसिक व्यथेत आणि सामाजिक परवशतेत लपलेली असते."[२] त्याची स्त्री- विषयी ठाम भूमिका असून अर्थार्जन किवा संघर्ष ही स्त्रीची नैसर्गिक भूमिका नाही हेच आपले स्थायीरूप आहे असे मानून स्त्री जेव्हा तिच्या स्थायी स्वरूपाना हीन लेखते स्त्रीत्वाच्या-स्त्रीधर्माच्या मर्यादा झुगारते तेव्हा गोधंळ निर्माण होतो. ह्या गुणामुळे समाज हादरतो समाजस्वास्थ डळमळीत होऊ लागते. समाजशक्ती क्षीण होऊ लागते. शांता निखळ यांनी वेगळे जग यातून पूनर्वसनाची समस्या हाताळण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

कादंबरी क्षेत्रातील स्त्रियांची कामगिरी वाखाणण्यासारखी असून अनेक स्त्री कादंबरीकारांनी लेखन केलेले दिसून येते. सिंधू गाडगीळ यांची 'क्षितिजा पार' (१९३९) यात वैमानिकाच्या जीवनाची कथा येते. शंकुतला परांजपे, सुधा साठे, लीला देशमुख, सरोजिनी बाबर, शांता शेळके यांनी कादंबरी वाङ्‌मयाला हातभार लावला. त्या काळातील स्त्रियांची परिस्थिती, शैक्षणिक दर्जा, वैचारिक पातळी, व्यक्तीजीवन व कुटुंबजीवन याचे दर्शन घडते.

## ब) आशा बगे यांच्या लेखणाची वैशिष्ट्ये :-

आशा बगे यांच्या साहित्यातील स्त्री ही आत्मभान आलेली शिक्षण प्रगल्भता लाभलेली उच्चशिक्षित, नोकरी करून सरळ असलेली अशी आहे. त्यांनी चित्रित केलेली स्त्री भावनेपेक्षा बुध्दिवादाचा पुरस्कार करणारी आहे. भावमधूर, लाजरी, साडी याची हौस असलेली दिसत नाही. वरवर पाहता स्त्री सामाजिक दृष्टीने व आर्थिक दृष्टीने बरीचशी स्वतंत्र असलेली दिसून

येते. कुटूंबातील माणसांना, आजूबाजूच्या माणसांना सांभाळून घेणारी, वेळप्रसंगी स्वत:चे म्हणणे बाजूला ठेवून तडजोड करणारी सोशिकतेचे बळ असणारी आणि म्हणूनच पारंपारिकतेला छेद न देता वास्तव्य स्विकारणारी मैथिली दिसते. मैथिलीचे आंतरिक स्वातंत्र्य जाणवावे इतके ठळक परंपरेला धरून असणाऱ्या जीवनसरणीतील स्त्रीचे हे समर्थ व्यक्तीत्व, जुन्या कुटूंबपद्धतीत भारतीय स्त्रीच्या जबाबदार आणि सार्थ व्यक्तीत्वाची आठवण करून देते. स्त्री पुरूष समागम, गरोदरपण अपत्यमृत्यु, बाळंतपण, यासारख्या अनुभवाकडे पाहण्याची स्त्रिची वेगळी दृष्टी आशा बगे व्यक्त करतात. याबाबतीत तिची वेगळी भावूक कातर अनुभूती याचे चित्रण 'भूमी'मध्ये पहायला मिळते. सामाजिक परिवर्तनातून लेखिकेला नव्या प्रेरणा मिळतात आणि विशिष्ट रूपबंधनातून त्या अविष्कृत केल्या जातात. सामाजिक बदल, स्थिंत्यतरामुळे लेखिकेचे मनोव्यापार बदलण्याची शक्यता असते स्त्री च्या परवशतेचे चित्रण, करून स्त्री च्या कुटूंबाकडून असलेल्या अपेक्षा, स्त्री चे आर्थिक स्वावलंबन पुरूषाचा स्त्री कडे स्वत:ची असलेली कर्तव्ये याची प्रतिबिंब ही आशा बगेच्या लेखणीची वैशिष्ट्ये आहेत. मैथिली ही 'भूमी' तील नायिका ही जात्याच हुशार होती. तिच्यावर आधुनिक विचारांचा पगडा होता. शंतनु आणि मैथिली यांच्यामध्ये तणाव असूनही आपल कर्तव्य म्हणून नात्यांच ओझं सांभाळत असतात. कौटुंबिक जीवनात आलेले अपयश स्त्रियांच्या भावनांना किती महत्व दिले जाते. हे तपासण्याचा प्रयत्न आशा बगेनी 'भूमी'त केलेला दिसून येतो. आईच्या मृत्युनंतर निराश्रीतासारखे आत्याच्या घरी राहताना आलेल्या अडचणी, झालेली घुसमट देवस्थळीच्या पुस्तकांनी केलेला साक्षात्कार त्यातून हट्टी मैथिलीच्या प्रवासात आत्या, रोहिणी, किर्ती, कावेरी, सुभद्रा, वासूकी, सुधीरची आई अशा स्त्रिया येतात ही पात्रे एकत्र आणून स्त्रीसमस्या विचार करताना दिसतात. "मैथिलीही आपण टोकाचे नकार घेवूनच तर लग्नाच्या गाठीत बांधले तर जात नाही?" वरील वाक्यातून आशा बगे मैथिलीच्या व्दिधा मन:स्थितीचे चित्रण करतात. एकूणच आशा बगे पुरूष पात्रानाही त्याच्या, मनाचा वेध घेवून न्याय घेवून न्याय देताना दिसतात. एकूण समाज व्यवस्थेमध्ये स्त्रीचे दुय्यम स्थान असल्याने स्त्रिया शृखंलाबद्ध झाल्या आहेत. यातूनच काही स्त्रिया प्रातिनिधीक दिसून

येतात. आशा बगे यांची साहित्यकृती सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेस गती देणारी आहे. स्त्री –जीवनातील संभाव्य परिवर्तन मैथिलीच्या रूपातून दाखवू शकतात. स्त्रीचे करारी रूप 'भूमी'त दिसते. स्त्रियांच्या सामाजिक जाणिवा विकसित झाल्याने त्या वेगाने कुटूंबाची चौकट बदलली नाही. तसेच स्त्री–पुरूष संबंधातील समस्यांची मांडणी सात्विक पातळीवर करण्याचा आशा बगेंचा प्रयत्न दिसतो. स्त्रीलाही पुरूषाप्रमाणेच स्वत:चे स्वातंत्र्य, व्यक्तित्व, इच्छा, आकांक्षा याची नव्याने जाणीव झाल्याने आपले अस्तित्व प्रस्थापित करण्यासाठी आर्थिक व मानसिक परिस्थिती निर्माण होत आहे. स्त्रीच्या दबलेल्या आवाजाला त्यामुळे धार आली. हळवी भावनाप्रधान वैशिष्ट्यांनी बायकी प्रतिमेतील मी ही बाई नाही त्यामुळे या मी मध्ये संवेदनशीलता आहे. पण घायाळ रडकेपणा नाही बाई म्हणून सोसण्याची तापट व संघर्षापासून पळून न जाता डोळे उघडे ठेवून शहाणपण स्वीकरण्याचा विनम्रता दिसते. स्त्री–पुरूष नात्याच्या विविध कोनातून घेतलेला शोध हे 'भूमी'चे वैशिष्ट आहे. जगाच्या साहित्यीक इतिहासातील अपवादात्मक ठरावी अशी एक कलाकृती १८८२ मध्ये लिहिली गेली. ताराबाई शिंदे लिखित 'स्त्री–पुरूष तुलना' हा निबंध सडेतोडपणे युक्तीवाद योजून केलेली तुलना स्त्रियांची सक्षमता पुरूषांपेक्षा अधिक आहे हे दर्शविते. आशा बगेंची कादंबरी कौटुंबिक वातावरणात व नातेसंबंधात अधिक रमते त्यांचे साहित्य स्त्रीकेंद्री असल्याने अनेक वाचक स्त्रियांचे साहित्य वाचताना त्यातली प्रत्येक गोष्ट त्यांच्या वैयक्तिक जीवनातीलच आहे असे अनेकदा गृहीत धरल्याची प्रवृत्ती दिसते. स्त्रीच्या अर्थाजन व स्वतंत्र कुटूंबपद्धतीचा परिणाम असेल किंवा स्त्री इतर क्षेत्रात वावरू लागल्याने तिला प्राप्त झालेल्या विशाल दृष्टीचा परिणाम असेल. आपल्या हक्कांची जाणीव झाल्याने स्त्री प्रत्येक क्षेत्रात पदार्पण करू लागली त्याचीच ही फलश्रुती आहे.

स्त्री पांढरपेशा समाजातील असून प्रत्येकीच्या वाट्याला आलेली समाजाची अवस्था जवळपास सारखी असलेली दिसते यास स्त्रियांचे प्रमुख कार्यक्षेत्र म्हणजे त्यांचे घर आहे. घर सांभाळुन काही करता आले तर करण्याचा प्रयत्न करून वेगळ्या रितीभाती त्यातून घडत जाणारे प्रत्येकीचे व्यक्तित्वही पूर्णपणे वेगळे त्यातून स्व प्रकटन त्यातील स्त्रीची पूर्ण व स्पष्ट प्रतिमा

चित्रीत झालेली आढळते. मैथिलीला केंद्रस्थान मिळाल्याने तिची प्रतिमा मनमोकळेपणाने अविष्कृत झालेले दिसते. आत्या स्वाभिमानी आहे. कुणापुढे तोंड वेंगडणे किंवा पदर पसरणे तिला आवडत नाही. मैथिलीला नोकरीच्या संदर्भात बोलण्याच्या प्रसंगावरून हे प्रत्ययास येते. त्यांच्या स्वाभिमानी वृत्तीवर प्रकाश टाकणारे बरीच उदाहरणे 'भूमी' त सापडतात. स्वभाव मनमिळावू असून चटकन कोणाशीही समरस होतो. आत्याची 'गोपाळरावांकडे' पाहण्याची नजर धाकाची वाटते. वागणूक अधिकाराची कळत नकळत पत्नीत्व गाजवताना आढळते. मैथिलीला कधीकधी गोपाळराव हुकमाचे ताबेदार वाटतात. आशा बगेंचे लेखन व्यक्तिप्रधान आहे. समुहाविषयी त्या कमी लिहितात जगण्याबद्दल एक सर्वांना मान्य असणारं तत्व त्या मांडत नाहीत. स्त्रिया त्यांच्या जाणिवा आणि प्रश्नांच्या तऱ्हा वेगवेगळ्या प्रकारे मांडतात. स्त्री विवाहित असताना आपल्या जगण्याकडे परंपरांनी युक्त असलेलं स्त्रीचं जगणं जगत असते. त्या स्त्रीमध्ये स्व त्व सिद्ध करण्याची क्षमता असुनही त्यांच्या व्यक्तिरेखा प्रातिनिधीक असून मैथिलीसारखी एकादी स्त्री आपल्या जगण्याचा स्वतंत्रपद्धतीने विचार करते तिच्यामध्ये घडणाऱ्या बदलाची चाहूल परिस्थितीपेक्षा तिच्या स्वभावातून तिच्या जगण्याच्या विशिष्ट्य दृष्टिकोनातून निर्माण झालेले दिसून येते.

## 'भूमी' या कादंबरीचे स्वरूप :-

मराठी साहित्यातील एक प्रगल्भ विचार मांडणारी समकालीन लेखिका म्हणून आशा बगे यांचा विचार करावा लागेल. नव्या अस्तित्वाचे नात्यानात्यातील सुक्ष्म पदर आणि कलात्मकता यांचे एक तेजस्वी कथानक आशा बगे यांच्या साहित्यात पहावयास मिळते. कथा मग ती दिर्घकथा असो किंवा लघुकादंबरी असो परंपरेतील अदिम अस्तित्वता आणि वर्तमानकाळातील आधुनिकता याचा निर्मळ मनाने केलेला स्वीकार याचा मिलाफ त्यांच्या लेखणीत कायम वास्तव्यास आहे. अन्य भारतीय भाषामध्ये अनुवाद करण्यासाठी ज्ञानपीठांनी ज्या कथा निवडल्या त्यातील एक कथा अत्तर या संग्रहातील महावस्त्र आहे. भारतीय परंपरेचे एक ताजे स्वच्छ निखळ रूप त्यांच्या कथा सामावलेल्या आहेत. 'मांडव' 'अनंत पूजा' या कथासंग्रहातून समृद्ध व्यक्तिचित्रण

तंत्रावरची कलात्मक पकड जीवनावरील निष्ठा, प्रेम या साऱ्याच पैलूंचे दर्शन होते. कादंबरीत आजच्या जगात वावरताना स्त्रीला भोगावे लागणाऱ्या सर्व ताणांचे अत्यंत समर्पक व कलापूर्ण भान राखून चित्रण केले आहे. आयुष्याचे सुटे सुटे तुकडे न जोडता नुसते जवळ ठेवावेत तशी माणसा माणसांच्या नातेसंबंधाची होणारी परवड आणि वेदना चित्रीत केलेली दिसते. आशा बगेंच्या कादंबरी विश्वातील स्त्री संस्कृतीशी, परंपरेशी, जवळची नाती असली तरी बदलत्या समाज वास्तवातील कुटूंब व्यवस्थेतील स्त्रीच्या वास्तवातील अस्तित्वाचे भान मध्यम वर्गीय बदलत्या मूल्यांची जाणीव ही त्यांच्याजवळ आहे. म्हणूनच त्यांच्या कादंबरीतील स्त्रिया व्यक्तिसंपन्न वाटतात.लेखिकेचे विस्तारित जाणारी क्षितिजे व संसार यातून त्यांच्या स्त्रीप्रतिमा साकार होताना दिसतात. स्त्रीप्रतिमा पारंपारिक न वाटता जाणिवपूर्वक नायिका बुद्धिमान बंडखोर, खंबीर तरीही स्त्रीत्वाच्या मर्यादा न ओलांडणारी दिसते. त्यांना लाभलेल्या संगिताच्या वारशाने आणि अभ्यासाने त्यांच्या कादंबरीला एक लयदार काव्यात्मक शैली प्राप्त झाली आहे. वातावरण आणि व्यक्तिमत्व यांचे एक बेमालुम मिश्रण 'भूमी'त दिसून येते. आश्रय व आश्रयदात्यांची भावना व जुन्या नव्या पिढीतील अंतर हे 'भूमी'त दिसते. जीवनविषयक व मूल्यविषयक जाणिव अत्याचार व्यक्तिरेखेतून साकारताना दिसते. स्त्री –जीवन हे सर्वाहून वेगळे भासताना सद्‌भावनेच्या, सद्‌वृत्तीचा, परंपरेचा ठसा त्यावर दिसतो. कादंबरीत मैथिलीची आजारी अम्मा, हॉस्पिटलचा परिसर, वातावरण निर्मिती, ऑपरेशन्स, मॅथ्यूज टिचर चा दुरावा, अम्माच्या मृत्यूने बेचैन होणारी या सर्वांचा जवळून अनुभव घेताना दिसते. आभाळ, पाणी, समुद्र, संध्याकाळ या साऱ्या गोष्टींचे लेखिकेचे वेड दिसून येते. सर्व प्रतिमाने तरल होऊन येतात. आत्याची व्यक्तिरेखा विलक्षण सामर्थ्यवान आणि शांत असून तिचा कुठलाही अट्टाहास नसून समोर येणाऱ्या जीवनाशी जुळलेला आकार ती सहजपणे स्विकारते. मैथिली व आत्या यांचे रक्ताचे नाते, भावाची मुलगी, सौदार्ह्यपूर्ण वागणूक, मधु, मिलिंद, चेतन, सुधीर, किर्ती यांच्या रूपाने मोकळेपणी स्वत:चे मन व्यक्त करणारी मैथिली दिसते. संजू, सुभाष, गोपाळराव, उदय यांच्या व्यक्तिरेखेतून वासनाच प्रत्ययास येते. आश्रीत म्हणून रोखलेली नजर घायाळ करते.

स्त्रित्वाची आगतिकता दिसून येते. आशा बगेंची लेखणी दु:खाच्या आगतिकतेबरोबर व्यक्तिचित्र रेखाटताना शंतनूच्या मानसिकेतवर भर देताना दिसते. त्यांच्या कादंबरीतून विशिष्ट ठेवण असलेल्या व्यक्तिचित्रण यांच्या ताणातून जीवनाचे मर्म उलगडत जातात. आशा बगे यांच्या अनेक व्यक्तिचित्रांच्या निमित्ताने त्यांचा मूल्यभाव आणि आयुष्यातील "मानण्याच्या काही जागा" याचे महत्व कळते. शंतनु व अशुंमन यांच्या निमित्ताने वडिल व मुलगा मैथिली व आत्या, आई मुलगी, मैत्रीण, यांच्या अंतरंगाविषयी व परंपरेतील अर्थपूर्ण आशय आशा बगे व्यक्तींच्या स्वभावचित्रणातून मांडतात.

## "भूमी" या कादंबरीतील कथानक, व्यक्तिरेखा इत्यादींचे चित्रण :-

"आशा बगे" मराठी साहित्य क्षेत्रात अनेक वर्षे आपला ठसा उमटविणाऱ्या लेखिका मधील एक ठळक नाव 'झुंबर', ' त्रिदल', 'सेतू' नंतरची उल्लेखनीय कादंबऱ्यांनंतरची ही कादंबरी महत्वपूर्ण आहे. पारंपारिकतेशी नाळ न तोडता आधुनिक जीवनसरणी आत्मसात करणारी त्यांच्या कादंबरीतील नायिका 'भूमी' तील 'मैथिली' दिसते. तिच्या अनाथ आयूष्यात सांभाळ करणारी 'आत्या' येते. त्यानंतर देवस्थळीबाई, शंतनू , मुलगा अंशुमन, उदय, गोपाळराव, संजू, सुभाष, चेतन, मिंलिद, डॉ. अरूणाचलम, डॉ. मित्रा, वासुकी, सुभद्रा, रोहिणी, सुधीर, लली अशी अनेक पात्रे येतात.

**आत्या -:**

ही मैथिलीच्या डॅडी विश्रामची बहिण मैथिलीला आपल्या बरोबर मुंबईला घेऊन जाणारी, बुध्दीचे भाषांतर होऊ शकत नाही असे सांगणारी, फेल गेलेल्या वर्षाबद्दल "असू दे आता करशील अभ्यास चांगला हे पहिलं वर्ष कृष्णार्पण."[३] नव्या उत्साहाने सुरूवात करायला लावणारी आत्या दिसते. अभ्यास न करणाऱ्या मैथिली बद्दल "आपल्या हुशार भावाची ही मुलगी. देखणी, गोड, कसलं विषं तिच्या मनात भरलं आहे?"[४] यातून मैथिलीने शिकावं व स्वावलंबी व्हावे अशी इच्छा दिसते. मैथिली बीनाला नोकरी देण्याविषयी विनंती करते तेव्हा "नोकरी स्वत: मिळवावी लागते लायकीनं - तिची भीक नसते मिळत." जून्या गोष्टींचा, अभ्यासाचा कंटाळा

आलाय असे मैथिलीच्या उद्‌गारावर, "अभ्यासाखेरीज काही करायचं नाही. या खुराड्यातून बाहेर पडायला मिळतं, बाहेरची हवा खायला मिळते. कंटाळा तर मला यायला पाहिजे."[५] आत्याचे म्हणणे असते "आम्ही सगळ्याजणी एक सारखं जगत असतो निदान तुझं तरी तसं होऊ नये. तू विश्रामची बुध्दी घेऊन आलीस."[६] या वाक्यातून मैथिली बद्‌दल काळजी करत असलेले आत्या दिसते. आत्याची व्यक्तिरेखा अतिशय सुंदरपणे रेखाटलेली आहे.

**देवस्थळी –:**

'वसुधा देवस्थळी' बँकेत सर्व्हीस करणारी प्रोफेसर देवस्थळी गाढ्या अभ्यासकाची पत्नी, शंतनुची आई, दांडेकरांची प्रेयसी, मैथिलीची मैत्रीण, या भूमिकेत वावरतात. मुलगा शंतनूकडे झालेले दुर्लक्ष त्यामुळे त्याच्या सहवासास मुकतात. मोठ्या घरात एकट्या पडल्याने मनाची झालेली व्दिधा मन:स्थितीत वावरतात. पत्ते, रमी, दारूच्या आहारी गेल्याने आरोग्याची हानी यामुळे मृत्यूही लवकर येतो. प्रो. देवस्थळींच्या साहित्य विश्वाला कंटाळलेल्या सर्व साहित्य विश्व वाचनालय व मैथिलीला देतात. त्यांच्या तुसड्या स्वभावामुळे घरी नोकर टिकत नाहीत. त्यामुळे मैथिली त्यांच्या घरी मदतनीस म्हणून घरी आल्यानंतर तिला त्रास देण्याचा प्रयत्न करतात पण मानभावी मैथिलीमुळे स्वत:बद्‌दल असलेले अहंकार त्यांचे गळून पडलेले दिसते.

**शंतनू –:**

प्रो. देवस्थळी व वसुधा देवस्थळी यांचा मुलगा मद्रासला इंजिनिअर म्हणून कंपनीमध्ये नोकरी करत असलेला दिसतो. आईच्या बाहेर ख्याली वृत्तीला कंटाळून घरापासून दूर राहत असलेला दिसतो. पुर्वायूष्यात वाईट संगत लागून "ड्रगच्या आहारी गेल्याने घरातून पैसे चोरायचा, पैसे लपवून ठेवले तर वस्तू, घड्याळं, एक दोनदा प्रोफेसरांचे पुस्तकही."[७] असे उद्‌गार बाई काढतात. शंतनूला त्याच्या वाईट काळामध्ये सावरण्याचा प्रयत्न दांडेकरांनी केल्यामुळे तो त्यांचा व्देश करत असलेला दिसतो. मैथिलीशी आईच्या मृत्यूनंतर शंतनू लग्नासंदर्भात भेटतो तेव्हा "मी आईशी आय वॉज नेव्हर अटॅच्ड टु हर' या वाक्याने निरूत्तर करतो."[८] मैथिलीच्या लग्नाबद्‌दलच्या प्रतिक्रिया ऐकल्यावर ती ज्या साध्या म्हणते ती, "ते ज्या तऱ्हेनं सांगत होती

ते– ती तऱ्हा–त्याला अवघड वाटली. ती मुलगीच अवघड वाटली. दांडेकरांना सरळ नाही म्हणून सांगावं असं वाटलं क्षणभर दांडेकर – ते ही त्याला नको होते आणि मुंबईही."[९] यातून शंतनूच्या मनाची व्दिधा अवस्था दिसते. शंतनू अतिशय संथ होता. स्वत:चे काम स्वत: करत असे. शारिरीक गरजेचा व्यवहार सोडला तर पत्नी म्हणून एकमेकांशी मने जुळलेली दिसत नाहीत. त्याच्या उठण्याची वाट पहात असलेली मैथिली पाहताच दादाचं असल्याचा आभास व्हायचा. मैथिलीला आपण मुल देऊ शकणार नाही. कारण चांगल काही आपल्या बाजूने घडत नाही. मुलचं हवं असेल तर दत्तक घ्यावे या मताशी असलेला दिसतो. पहिल्या मुलीच्या मृत्यूने स्वत:ला अपराधी समजतो. अंशुमनच्या जन्माने त्याच्या बालक्रिडामध्ये स्वत:ला झोकून देतो. अंशुमनशी खेळणे त्याला शाळेत सोडणे, आणणे, त्याचे कपडे व्यवस्थित ठेवणे, त्याला नवीन पदार्थ खाऊ घालणे . या दैनंदिन क्रमात नव्याने आयुष्य जगू लागतो. मैथिलीचं विस्तारलेलं जग नेहमी भुरळ पाडत असते. तिच्या कष्टाकडे दुर्लक्ष करून तीचं यशस्वी करीयर पाहतो. मैथिलीमुळे आपली घुसमट होते. याबद्दल वैवाहिक जीवनामध्ये नाजूक बंध, मैथिलीच्या तक्रारी अंशुमन व मित्र गणेश यांना सांगतो. मैथिलीच्या घर सोडून जाण्याने शंतनूला हुरूप येऊन तो नवीन घर घेतो. घरामध्ये अनेक बदल करतो अशा अनेक छटा त्याच्या स्वभावामध्ये दिसून येतात.

**अंशुमन –:**

हा मैथिलीचा मुलगा शंतनूच्या अतिशय जवळ गेलेला दिसतो. "डॅडी इज माय बेस्ट फ्रेंड ! आय एम मिसिंग हिम"[१०] शंतनू तीन चार महिन्याच्या कालावधीनंतर ऑफिसला गेल्यानंतर मनाची झालेली अवस्था बोलून दाखवतो. यामधून मैथिलीला बाप लेकामध्ये असलेलं मित्रत्वाचे नातं रूजलेलं दिसतं. चहाचा कप मैथिलीनं अंशुमनकडे दिल्यावर हसला, "हो हसणंही तेच, जुनं लहानपणचं होत–तिला वाटलं."[११] यातून आईच्या वात्सल्य छटा मुलामध्ये शोधण्याचा प्रयत्न आशा बगेंच्या व्यक्तिमत्वातून येते. अंशूमनच्या मैथिलीची आर्टिकलबद्दलची प्रतिक्रिया आवडली नाही. " पण अम्माला तर नाही आवडलं मी लिहिलेलं."[१२] व्यक्तिरेखा लहान असली तरी आत्मविश्वास प्रकट करताना दिसते. तणाव असलेल्या घरामध्ये अंशूमन खूप चांगला घडला

हे कावेरीचे वाक्य अंशूमनची ओळख करून देतो. शंतनू व मैथिलीबद्दलच्या प्रतिक्रिया, "तुम्ही दोघं किती चांगली आहात, अम्मा ! पण तेच तुम्ही एकमेका करता मात्र तसे नाही."[१३] यातून आशा बगे यांनी आई वडीलांच्या स्वभावाचे निरीक्षण मुलगा किती अचूकपणे करू शकतो हे दिसून येते. एम. एस्सी. फिजिक्स जॉब करत असलेला, स्वत:चे लग्न ठरवलेला, सुसंस्कारीत असा अंशूमन, मैथिली, "तू घराला म्हणजे तुझ्या डॅडींना फार जखडून घेतलं आहेस. त्यानं तुझं नुकसानही झाल बरचं."[१४] यावर सुधीर – मैथिलीचे संबंध पचवून त्यानं मैथिलीला घरी परत येण्याविषयी विचारलं "तुला कठीण नाही जाणार?"[१५] आई वडिलांच्या संघर्षामध्ये वडिलांच्या बाजूने उभा असलेला दिसून येतो.

**सुभद्रा :-**

'सुभद्रा' जोशी बंगलोर विद्यापीठ मध्ये सिनीअर म्हणून असलेली अधिव्याख्याती आहे. वडिल आय.ए.एस. ऑफिसर म्हणून रिटायर झालेले ,भाऊ मोठ्या पोस्टवर व वहिनी इंजिनिअर घरी नोकर चाकरांची वर्दळ अशा समृध्द घरातील सुभद्रा मैथिलीच्या इंटरव्ह्युला होती. तिचे लग्न झालेलं नव्हतं. स्वभावाने साधी भोळी असलेली सुभद्रा फार बोलकी होती. मनामध्ये सुधीरशी लग्न करायचा विचार असून प्रत्यक्ष लग्न ठरल्यावर वय ओलंडून गेल्यावर येणाऱ्या अडचणींना सामोरे जाण्यापेक्षा आहे हेच बस झालं. असं दोघेही ठरवून लग्न मोडतात. मैथिलीला सुभद्रा घर मिळवून देते व सजवूनही देते. "तरी पण एक औदासीन्य आहेच, मैथिली! का? ते लोक तर चांगले मजेत राहत असतील आपल्या घरी ! तुच का? "[१६] या उद्गारातून असलेली कनव व मैथिली बरोबर असलेली निखळ मैत्री दिसते.

**सुधीर –:**

'डॉ. सुधीर निरंजन' अमेरिकामधील 'स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटी' मध्ये काही वर्ष काम केलेले, 'मद्रास युनिव्हर्सिटी' मध्ये 'सायकॉलॉजी डिपार्टमेंट' ला व्याख्यानासाठी आलेले असताना मैथिलेशी झालेली ओळख. "विषयाची मांडण्याची पध्दत तिला आवडलेली असते. 'आशा बगे' सुधीरचे व्यक्तिचित्र रेखाटताना, युनिव्हर्सिटीच्या परिसरातील झाडांपासून सारं,

बोलताना, विषय मांडताना त्यांचा उच्चार काही शब्द नव्हते करत; तर त्यांचे डोळे, मोठे रूंद कपाळ, वरखाली होणारा त्यांचा हात, उभं राहण्याची त्याची ढब........ सगळ्यातून त्यांचा विषय मांडत होते."[१७] सुधीर पत्नीच्या मृत्यूनंतर अमेरिकेला निघून जातात. नवीन लग्न करायच्या तयारीत असलेले आजारापणामुळे पुन्हा घरी भारतात येतात. सुभद्रा जोशी बरोबर लग्न करायचे ठरवून पुन्हा नकार देतात. व मुलगी दर्शनाकडे अमेरिकेला निघून जातात. आयुष्यामधील विरंगुळ्याचे क्षण आयुष्यात फार कमी येतात. परंतु मैथिलीच्या निखळ मैत्रीने भारावून जातात व आपले मन मोकळे करतात. लली, दर्शना, संचिता, आई – वडिल यांच्या बरोबर एकत्र कुटूंबात राहत असलेले व्यक्तिमत्व उठून दिसते.

**गोपाळराव, संजू, उदय, सुभाष –:**

या चार व्यक्तिरेखा अनाथ असलेल्या मैथिलेचा फायदा घेण्याचा प्रयत्न करताना दिसतात. **चेतन, मिंलिद, किर्ती, मधु –:**

अतिशय सुस्वभावी निखळ मैत्री जपण्याचा प्रयत्न मधुच्या, संदर्भात मैथिली नापास झाली नसती तर त्या मैत्रीला अर्थ आला असता. चेतन हा सटाफटिंग स्वत:च्या ध्येयाच्या दिशेने भरारी घेतलेला दिसतो. मिंलिद हा मैथिलीला लग्नाच्या बाबतीत धर्माच्या भिंतीतच अडकून राहतो. आई वडिलांच्या शब्दाबाहेर जाण्याचे सामर्थ्य नसलेला मिंलिद दिसतो. किर्ती नवऱ्याला त्याच्या मर्जी प्रमाणे आयुष्य बहाल करून स्वत:चा मुलगा त्याच्याजवळ ठेवून मुलगी घेऊन शिक्षिका म्हणून नोकरी करताना आढळते. डॉ. मित्रांची मिंलिद बद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना आशा बगे म्हणतात,

"त्यानं काय गमावलं आहे हे त्याला कधीच कळणारच नाही"[१८] यातून आशा बगेंची लेखणी प्रभावी असलेली दिसते.

## आशा बगे यांचे इतर लेखनाचे स्वरूप :–

मराठी वाङ्मयामध्ये विशेषत: कथेच्या प्रांतामध्ये 'आशा बगे' यांचे परिमाणाच्या कथा लिहिणाऱ्या साहित्यीकामध्ये नाव आदराने घेतले जाते. १९७५ च्या नंतरच्या काळातील मराठी

कथेवर, दलित चळवळ, स्त्रीमुक्ती वर्ष यातून अनेक बदल झाले. त्याचा प्रवाह कथेकडे वळलेला दिसून येतो. या प्रवाहामुळे 'आशा बगे' यांच्या कथा मानवी मुल्यांवर अधिष्ठित अशी चिरंतर मुल्ये, आधुनिकता जोपासताना दिसते. भारतीय संगीता बद्दल 'आशा बगें' ना विलक्षण ओढ असून त्याचा प्रत्यय त्यांच्या साहित्यातून दिसून येतो. आपली स्वतंत्र मुद्रा मराठी कथा वाङ्मयातून उमटली आहे. नव्या स्त्रीच्या व्यक्तित्व घडणीचा शोध समर्थपणे घेतला. हा शोध अतिशय परखडपणे, निर्भयपणे घेताना त्यांच्यामध्ये भावविवशता दिसत नाही. त्यांची भुमिका दिर्घकथा यामधून अधिक स्पष्ट दिसते. 'आशा बगे' यांनी १९७० कॉलेज जीवनापासून लेखनाला सुरूवात केली. त्यांच्या लेखणीवर प्रसिध्द लेखक पु. भा. भावे यांच्या उत्तम शैलीचा व लेखन संस्काराचा प्रभाव लेखकाच्या मनावर झाला. आदर्शवादाचा पुरस्कार न करता पात्राचे जीवन समजून घेऊन माणून जसा आहे तसा कथेमध्ये उतरवलेला दिसतो. विषयांची विविधता 'आशा बगें' च्या कथेत फारशी दिसून येत नाही. त्यांना ठराविक विषयांचेच त्यांना आकर्षण वाटते. त्यांच्या कथेतील पात्रे अत्यंत सुखवस्तु, बहुधा उच्च मध्यमवर्गीय सुप्रतिष्ठित वातावरणातल्या आहेत.

"मारवा हा कथासंग्रह ........... मधील असून माणसाच्या एकमेकांत गुंतलेल्या अतूट बंधनाची बंदीषी होऊन आलेल्या दिसतात. भावात्मकतेने माणसाचे मन, आपल्या पुढे उलगडत, जुन्या परंपरेशी नाते सांगत शुचिर्भूत आणि मांगल्याला जपणाऱ्या स्त्रीच्या मुल्यविषयांवर प्रकाश टाकणाऱ्या अशा या कथा आहेत."[१९] मारवा मधील विशेषत: 'रूक्मिणी' या कथेमुळे आशा बगे कथाकार म्हणून उदयास आल्या "समिक्षक धो.वि.देशपांडे एका खाजगी बैठकीत कथेवर बोलताना म्हणाले होते की, आशा बगे यांनी 'रूक्मिणी' ही एकच कथा लिहिली असती तरी त्याचे नाव कथा वाङ्मयात अमर झालं असते; म्हणूनच मनस्विनी ते रूक्मिणी हा एकच तरल मनाचा सूरमयी प्रवास ठरतो."[२०] 'मारवा' कथा संग्रहामध्ये एकूण १३ कथा असून रंग रूक्मिणी या दोन कथा शैलीदार असलेल्या दिसतात. मारवा या कथा संग्रहामध्ये नव्या जुन्या पिढीतील सुक्ष्म संघर्ष रघुनाथ व आबा या पात्रांव्दारे आपल्या समोर येतो पण संगीताच्या माध्यमातून

आबांनी नजर मागे ओढली. "नदीच्या एलथडीला डोंगरमाथ्यावर उभ्या असलेला हा देशपांड्यांचा तीन मजली वाडा अजूनी पूर्वीच्या दिमाखात उभा होता. गावातल्या साऱ्या घरापेक्षा उंच वाड्याच्या एका अंगाला गोपाळकृष्णाचे मंदिर नि समोरच्या बाजूला महादेवाचे, दोन्ही मंदिरे देशपांड्यांचीच !"[२१] यामधून देशपांड्यांचा कुलाचार दिसतो.

"चंदन"कथासंग्रहामध्ये पाच कथा आहेत "चंदन", 'समुद्र', 'श्राद्ध', 'एका पावसाळी संध्याकाळी', 'वर्तमान' या सर्व दीर्घ कथा आहेत. दीर्घ कथेच्या माध्यमातून सखोलपणे कमीतकमी शब्दात भावभावना पात्रांची, प्रसंगाची मांडणी सविस्तरपणे मानवी जीवनाचा लेख मांडण्यामध्ये यशस्वी झालेल्या दिसतात.

"अत्तर" हा कथासंग्रह १९८५ मध्ये प्रसिध्द झाला. 'अत्तर', 'बंदिशाळा', 'निवडुंग', 'नर्सिंग होम', या दीर्घ वळणाच्या कथा असून अनुभवाचे रंग,रस,गंध,कला स्विकारणाऱ्या वाटतात. अन्य भारतीय भाषामध्ये अनुवाद करण्यासाठी 'ज्ञानपीठ' ने ज्या कथा निवडल्या त्यातील एक कथा 'महावस्त्र' आहे. त्यांच्या कथांमधून घटना फारशा नसून प्रसंग जास्त असलेले दिसतात. तसेच त्यांनी व्यक्तिचित्रे विलक्षण ताकदीने उभारलेली दिसतात. या संग्रहातील कथा पारंपारिकतेवर श्रध्दा ठेऊन लिहिलेल्या दिसतात. 'अत्तर' ही कथा वाचताना त्याचा आशय अनेक पदरी असून कलात्मक अभिव्यक्ती साध्याच विषयातून मांडलेली आढळते.

"पूजा" १८८९ मध्ये दीर्घ कथांचा संग्रह प्रसिध्द झाला. माणसाच्या वृत्ती-प्रवृत्तीचे अनाकलनीय नाते दर्शवणाऱ्या व मानवी स्वभावाला छेद देणाऱ्या कथा पिढ्यानु पिढ्या ब्राम्हण्याला सांभाळणाऱ्या जुने अवशेष हाताशी धरून नवीन जाणीवा निर्माण करणाऱ्या कथा आहेत.

'अनंत' यामधील कथा वेगळ्या दृष्टीकोनाच्या असलेल्या दिसतात. जीवनात येणारे लहान मोठ्या अनुभवाकडे 'आशा बगे' जिव्हाळ्याने व आत्मविश्वासाने बघतात. "कथांना चिंतनाचे वलय असून आशयाचे केंद्र बदललेले दिसते. जीवनाचे सर्व संदर्भच बेईमान, विनाशकारी झाल्याने कोणतेही मुल्यच काळ्याकूट्ट कोलाहलात लेखिकेचे चिंतन सुरू होते.म्हणूनच यात

आशयसुत्रामध्ये विशेषत: केंद्रस्थानी असलेल्या जीवन जाणीवेत मुलत: फरक पडलेला आहे. भावकथा असो, दीर्घकथा असोत बगे यांच्या कथेच्या विश्वात एका नवीनपणाचं दर्शन आहे. रूपवादी किंवा मर्यादित विश्वातले सत्य असूनही त्यांच्या कथेचा आकृतीबंध इथे शोकात्म आशय परंपरेला जाऊन भिडतो."[२२]

'आशा बगे' यांच्या कथा नवीन असून त्यांनी स्वत:च्या आत्मशोधातून निर्माण झालेल्या वाटतात. कथासंग्रहातून भेटणाऱ्या स्त्रियांपेक्षा कादंबरीतील स्त्रिया वेगळ्या स्वरूपात भेटतात. त्यांचे विचार पुरोगामी वाटतात. अशा स्त्रिया येणाऱ्या परिस्थितीनुरूप संस्कार आणि संस्कृतीच्या गाभ्यात शिरून आवरण घेताना दिसतात. 'मनस्विनी' या कादंबरीत 'आशा बगे' यांना दुबळी स्त्री पसंत नसल्याने त्यांनी नायिकेची बहिण विलक्षण सामर्थ्यवान असून शांत रंगवलेली आहे. माणसाच्या स्वभावाच्या विविध छटा रंगवताना त्या दुसऱ्याच्या स्वभावाशी कशा मिळत्या जुळत्या घेतात. त्या म्हणतात, "काही माणसचं अशी त्यांचा कुठला अट्टाहास नसतो, मागणं नसतं, पाण्यानं मिसळून दुसऱ्या कुणाचाही रंग चटकन घ्यावा तसे समोर वाढून येईल त्या जीवनाशी जुळलेला आकार ती सहजपणे घेत राहतात. तरीही ती माणसं वगळली जाऊ शकत नाहीत. आपला तोल पुन: पहिल्यापासून तपासून पहायला लावतात. ही माणसं, अशी ही दमयंती."[२३] 'आशा बगे ' यांच्या कादंबरीतील स्त्रिया बंडखोर असल्यातरी सुसंस्कारीत वाटतात.

'झुंबर' ही कादंबरी स्त्री भोवताली फिरून मनाची घालमेल व पुरूष सहवासातील अनुभवांचे चित्रण करते. स्त्री–पुरूष यांचे समांतर पातळीवर चित्रण करतात 'झुंबर' ची नायिका 'वसुमती' ही धाडसी असून 'डॉ. ऋषिकेश अधिकारी', 'डॉ. राघव', 'वसुमती' या त्रिकोणात कथानक फिरत असताना नवीन जीवनाची ओढ, सामान्य सुखाच्या कल्पना, पुर्वायुष्यात गमावलेले सुख मिळवण्याची आस, मनावर झालेले संस्कार, बदल स्विकारायला तयार नसलेले दिसते. आयुष्यात व्यक्तिच्या वाट्याला दु:ख येते. त्याला कोणतेच कारण लावता येत नाही. त्यांच्या कथा– कादंबरीतील परंपरेचा व सार्थ संस्कृतीचा अभिमान बाळगून नायिका संघर्ष टाळतात. बदलत्या समाज व्यवस्थेतील किंवा कुटूंब संस्थेतील बदलत्या अस्तित्वाचे भान

जपताना दिसतात. 'आशा बगे' यांच्या साहित्य विश्वातील स्त्रियांजवळ विचार करण्याची क्षमता आहे. 'आशा बगे' यांचे सामर्थ्य त्यांच्या कथा कादंबरीतून दिसते-त्यांच्या शैलीत प्रतिभात्मकता व अर्थगर्भता प्रतिकात्मकता यांचा अनुभव देणारी वाक्ये सहज पहावयास मिळतात. वास्तव्याच्या नव्या दर्शनाने झेपावलेली त्यांची प्रतिभा विकास पावलेली दिसते.

## निष्कर्ष:-

स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये मराठी साहित्यात जे वेगवेगळे प्रवाह निर्माण झाले आणि बहरले त्यामध्ये कथा, कादंबरी, नाटक, कविता, चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथन यांचा उल्लेख करावा लागेल. वरील साहित्यात श्रेष्ठ मुल्ये प्राप्त करून देणाऱ्या अनेक लेखक, कवींनी महत्वपुर्ण भूमिका बजावली आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील एक प्रतिभासंपन्न लेखिका म्हणून 'आशा बगे' यांचे कथा व कादंबरी विश्व चांगल्या अर्थाने भारतीय स्त्रीचे असलेले दिसून येते. त्यांच्या कथानकातील पात्रे उच्चभू कुटूंबातील सुसंस्कारीत असलेली दिसतात. 'आशा बगे' यांनी कसदार विषय, कसदार प्रसंग, अर्थगर्भ, प्रतिकात्मक भाषा, सर्वसामग्री घेऊन त्यांच्या कथा- कादंबरी साध्या विषयाला स्पर्श करताना दिसतात."त्रिदल, मनस्विनी, झुंबर, सेतू , भूमी" इत्यादी कादंबरीमध्ये स्त्री-पुरूषांच्या मनोवस्थेचे अत्यंत प्रत्ययकारी चित्रे रंगवलेली आहेत. तसेच त्यांच्या कथासंग्रह "मारवा, पूजा, चंदन, मांडव, अनंत, कुरूकक्षेत्र" अशा एकाहून एक सरस कलाकृती आहेत.

"भूमी" या कादंबरीमध्ये मर्यादेतच अडकून न राहता आपले कार्यक्षेत्र विस्तृत करणाऱ्या आधुनिक 'मैथिली'ची कथा आहे. या कादंबरीमध्ये पुरूष पात्रांनाही त्या न्याय देताना त्यांच्या स्वभावाचे सुक्ष्म निरीक्षण करतात. व्यक्ति जीवनाच्या तळाशी असलेल्या दु:खाला सामोरे जाण्याचा प्रयत्न आशा बगे यांची कथा कादंबरीतील पात्रे करतात.

## संदर्भ – सूची


१) ललित अंक: सप्टेंबर १९८९ पृष्ट १६. वरील लेख

दशकातील साहित्यीक : आशा बगे – प्रा. अविनाश सहस्त्रबुध्दे पृष्ट १६.

२) प्र. वा. बापट व ना. वा. गोडबोले — मराठी कादंबरी (तंत्र आणि विकास) व्हीनस प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे ३०. व्दितीय आवृत्ती १९५७ पृष्ट ३४१.

३) आशा बगे — भूमी. मौज प्रकाशन गृह. दुसरी आवृत्ती २००६. पृष्ट २७.

४) तत्रैव, पृष्ट ३१

५) तत्रैव, पृष्ट ३४

६) तत्रैव, पृष्ट ३५

७) तत्रैव, पृष्ट ६४

८) तत्रैव, पृष्ट १०९

९) तत्रैव, पृष्ट ११२

१०) तत्रैव, पृष्ट १५८

११) तत्रैव, पृष्ट १६६

१२) तत्रैव, पृष्ट १७०

१३) तत्रैव, पृष्ट १७३

१४) तत्रैव, पृष्ट २४२

१५) तत्रैव, पृष्ट २४३

१६) तत्रैव, पृष्ट २२५

१७) तत्रैव, पृष्ट १६८

१८) तत्रैव, पृष्ट ८७

१९) सुलभा हेरलेकर — आशा बगे नवे अस्तित्व.
कौस्तुभ प्रकाशन, नागपूर प्रथमावृत्ती,
विजयादशमी१९९६. पृष्ट १३.

२०) तत्रैव, पृष्ट १३.

२१) तत्रैव, पृष्ट १५.

२२) तत्रैव, पृष्ट ३८.

२३) आशा बगे — मनस्विनी.
मेनका प्रकाशन, पुणे ३०.
प्रथमावृत्ती १९७८ पृष्ट १०६.